जा.क्र.प्रावि-१/२०००-०१/ १४२-४१/४६
विभागीय शिक्षण उपसंचालकांचे कार्यालय,
औरंगाबाद विभाग, औरंगाबाद.
दिनांक : ३०.३.२००१

प्रति,

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद,
जालना.

विषय :- ग्रामीण भागातील दिनांक २८ एप्रिल, १९८९ नंतर मान्यता दिलेल्या विना अनुदानीत खाजगी प्राथमिक शाळांबाबत अनुदानासाठी असलेली अंतराची अट रद्द करुन पात्र शाळांना अनुदान देणेबाबत.

संदर्भ :- १. शासन निर्णय क्र. व्हीएलएस/७०८८/(८७८९)/प्राशि-१, दि. २८.४.१९८८
२. शासन निर्णय क्र. पीआरई १०२०/(२३८५)/प्राशि-१, दि. १७.१०.२०००
३. शासन निर्णय क्र. व्हीएलएस १०००/(२४५५)/प्राशि-१, दि.८.११.२०००
४. शासन शुध्दीपत्रक क्र.पीआरई १०२०/(२३८५)/प्राशि-१, दि.१३.१२.२०००
५. शासन निर्णय क्र. पीआरई १०२०/२३८५/प्राशि-१, दि. १.३.२००१
६. मा.शिक्षण संचालक (प्राथमिक) म.रा. पुणे यांचे पत्र क्र. खाप्राशा/१०९८/ १.५ कि.मी./शाळा/५११, दिनांक २८.११.२०००
७. मा.शिक्षण संचालक (प्राथमिक) म.रा. पुणे यांचे पत्र क्र. बीयुडी/२०००-२००१/ पुमा/२०००/प्राशिस, दिनांक २७.३.२००१

उपरोक्त संदर्भीय विषयी आपणाकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार तसेच संदर्भांकित शासन निर्णयानुसार ग्रामीण भागातील दिनांक २८ एप्रिल, १९८९ नंतर मान्यता दिलेल्या विना अनुदानीत खाजगी प्राथमिक शाळांबाबत अनुदानासाठी असलेली अंतराची अट रद्द करुन पात्र शाळांना खालील अटींची खात्री करुन परिशिष्ठ `अ` मधील शाळांना त्यांच्या नांवासमोर दर्शविलेल्या टप्प्यावर जून २००० पासुन अनुदानावर आणण्यांत येत आहे.

**परिशिष्ट `अ`**

| अ.क्र. | संस्थेचे व शाळेचे नांव | माध्यम | मान्य वर्ग | जून २००० पासून अनुदानास पात्र ठरलेलीटक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. |
| १ | मत्सोदरी शिक्षण संस्था, जालना<br>मत्सोदरी प्राथमिक शाळा, घनसावंगी<br>ता.घनसावंगी | मराठी | १ ते ४ | ६०% |

उपरोक्त परिशिष्ट `अ` मध्ये नमुद केलेल्या शाळांना अनुदान संदर्भांकित शिक्षण संचालनालयाचे पत्र दिनांक २७.३.२००१ मधील तरतूदीच्या अधिन राहूनच अनुदान अदा करण्याची कार्यवाही करावी.

सदरील शाळा खालील अटींची पूर्तता करीत असल्याची खात्री करुनच वेतन व वेतनेत्तर अनुदान अदा करण्याची कार्यवाही करावी.

१. संबंधित शाळेस खात्याची प्रथम मान्यता असल्याची खात्री करावी. सदरील शाळेस शासनाने कायम विना अनुदान तत्वावर परवानगी दिलेली नसावी.
२. संबंधित प्राथमिक शाळेत प्राथमिक शिक्षकासाठी विहीत केलेली शैक्षणिक अर्हता असलेले प्रशिक्षित शिक्षक नियूक्त केलेले असल्याची खात्री करावी. तसेच शिक्षकांना वैयक्तिक मान्यता देतांना शिक्षकांची भरती शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या आरक्षण विषयक नियमानुसार असल्याची खात्री करावी.

३. संबंधित प्राथमिक शाळेत सध्या जर अप्रशिक्षित शिक्षक कार्यरत असतील तर शासन निर्णय क्र. सीपीटी १०००/(१३२/२०००)/प्राशि-३, दिनांक २ जून, २००० व समक्रमांक शासन शुध्दीपत्र दिनांक ११ जूलै, २००० मधील अर्टीची जे अप्रशिक्षित शिक्षक पूर्तता करीत असतील अशा शिक्षकांना वेतन अनुदानासाठी ग्राहय धरण्यांत यावे.

४. शासन निर्णय दिनांक २८.४.१९८९ मधील निकषानुसार सदरील शाळा अनुदानास पात्र ठरते याची खातरजमा करुन अनुदान अदा करावे.

५. संस्था चालकांनी अनुदान मंजूर व्हावे म्हणून न्यायालयात दावे अगर याचिका दाखल केलेल्या नसाव्यात.

६. संबंधित शाळेत अतिरिक्त तुकडया/वर्ग असल्यास त्यास सक्षम अधिकाऱ्यांची मान्यता असल्याची खात्री करुन अतिरिक्त तुकडयांना अनुदान देण्यांत यावे.

७. परिशिष्ट `अ` मधील शाळांच्या नांवासमोर दर्शविल्याप्रमाणे संबंधित शाळा जून २००० पासून ज्या टप्प्यात पात्र ठरते त्याच टप्प्यावर जून २००० पासून वेतन व वेतनेत्तर अनुदान मंजूर करावे त्यापूर्वीचे अनुदान थकबाकी म्हणून अनुज्ञेय राहणार नाही.

८. अनुदानाच्या निश्चितीमुळे काही जास्त रक्कम जमा झाली आहे असे आढळून आल्यास ती रक्कम भविष्यात प्रदान होणाऱ्या वेतन व वेतनेत्तर अनुदानातून समायोजित करुन अथवा इतर प्रकारे शासनास परत करण्याबाबतचे हमीपत्र संबंधीत शाळेच्या संस्थाचालकाकडून घेण्यांत यावे.

शिक्षण उपसंचालक,औरंगाबाद
विभाग, औरंगाबाद.

प्रतिलिपी माहितीस्तव सादर.

१. मा. शिक्षण संचालक (प्राथमिक) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

२. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना.